
# श्री दयानंद सरस्वती



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा·वा·
दा. क्र. ८९८५
IRBK-0108195
IRBK-0108195

ठा. क्र. १९८५

॥ श्री ॥

अनुक्रम १९८५
विभाग
क्रमांक
नों. दि.

आधुनिक महर्षि : ४

# श्री दयानंद सरस्वति

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. १९८५ नों. दि. ............
वि. ... क्र. ..................

लेखक

यदुनाथ थत्ते

IRBK-0108195
IRBK-0108195

मूल्य चाळीस नवे पैसे

ग्रंथप्रकाशक व ग्रंथविक्रेते
**श्रीराम प्रकाशन**
ठाकुरद्वार मुंबई क्रमांक २



## श्री दयानंद सरस्वति

एके काळीं जगद्गुरु पदवीला पोंचलेला, संस्कृतीचें व विद्येचें आगर असलेला भारतवर्ष अज्ञान व रूढि यांच्या कर्दमांत फसलेला होता. श्रीहि नव्हती, धीहि नव्हती, निस्तेज, निष्प्राण सांगाडे सर्वत्र वावरत होते. याची तरुणपणींच खंत वाटून ही स्थिति सुधारण्यासाठीं जीवन समर्पण करण्याचा श्री दयानंद सरस्वतींनीं कृतनिश्चय केला. सबंध समाजाला त्यांनीं नवधर्माची दीक्षा दिली. जातिभेद, नाना देवतांची कर्मकांडात्मक पूजा व इतर दुष्ट सामाजिक चालीरीति व रूढि यांच्याविरुद्ध त्यांनीं युद्ध मांडलें. दयानंद कर्तबगार व लढवय्ये धर्मसुधारक होते. त्यांनीं वेदप्रणीत धर्माचें पुनरुज्जीवन केलें.

जन्म १८२४. समाधि १८८३.

★

# श्री दयानंद सरस्वति

अनुक्रम 20005
विभाग
क्रमांक 2088
नों. दि.

## मूळशंकर

काठेवाडांतलें मोरवी संस्थान. अंबाशंकर नांवाचे एक गृहस्थ तेथें जमादारी करीत. शिवाचे परम उपासक होते. शिवाप्रमाणेंच त्यांचा स्वभाव : एकीकडे मेणाहून मऊ आणि दुसरीकडे वज्रापेक्षां कठोर ! त्यांच्या पत्नी स्वभावानें अति प्रेमळ, जणुं दयामूर्तिच. ह्या दांपत्याला १८२४ सालीं मुलगा झाला. त्याचें नांव ठेवलें मूळशंकर. अंबाशंकरांचे एक भाऊ स्वभावानें मोठे सौजन्यशील होते. मातापिता आणि हे काका ह्या तिघांचा विशेष परिणाम मूळशंकरच्या घडणींत झाला.

पांचव्या वर्षी मूळशंकरला अक्षरओळख करून देण्यांत आली. त्याच्याकडून वेगवेगळे श्लोक पाठ करून घेण्यांत येऊं लागले. मूळशंकरलाहि ह्या गोष्टी आवडत. मूळशंकर आठ वर्षांचा झाल्यावर त्याची मुंज करण्यांत आली. त्याला संध्या आणि उपासनेची संथा देण्यांत आली. घरांत भक्तीचें वातावरण असे. वडील शंकराचे अनन्य भक्त. त्यामुळें मूळशंकर कथाकीर्तनांना जात असे. आपोआपच तो बहुश्रुत बनला. कथाकीर्तनांत जें कांहीं ऐके त्यावर आपल्यापरी तो विचार करी. वडिलांच्याबरोबर वारंवार देवळांत जाण्याचा प्रसंग येई. वडीलहि त्याला हौशीनें बरोबर घेऊन जात.

करण्याचा वडिलांचा प्रयत्न आहे, हें मूळशंकरला कळलें. त्याला वाईट वाटलें. तो निराश झाला. स्वस्थ बसला.

मूळशंकर बोलेनासा झाला तरी त्याच्या डोक्यांतलें वादळ शमलें नाहीं कीं त्याला झोपाहि आली नाहीं. उजाडतांच तो तडक घरीं आला. देवळांत आतां त्याला थांबवेना. तो अगदीं थकून गेला होता, शिणला होता. त्याचा नेहमीं उल्हसित असणारा चेहरा कोमेजला होता. धडधाकट शरीरावर मरगळ आली होती. त्याचें मन बंड करूं मागत होतें.

सकाळीं मूळशंकर दिसला नाहीं तेव्हां अंबाशंकर जरा चपापलेच. पण झाल्या गोष्टीबद्दल विचार करण्याला त्यांना फुरसतच नव्हती. ते देवदेव करण्यांत मग्न झाले. पुढें मूळशंकरनें घरीं जाऊन शिवरात्रीचा उपासहि मोडला हें कळलें तेव्हां ते खूप संतापले! रात्रींच्या प्रश्नांनीं त्यांचें माथें भडकलें होतेंच. आगींत जणुं तेल पडलें! हल्लींचीं पोरें थोडें शिकलीं कीं शेफारून जातात, असें त्यांच्या मनांत आलें. त्यांनीं मूळशंकरला धारेवर धरलें. पण तो जराहि विचलित झाला नाहीं. वडलांच्या रागापासून त्याचा बचाव करण्यासाठीं त्याची आई आणि चुलते पुढें आले आणि प्रकरण तेवढ्यावरच थांबलें.

आतां धर्म आणि ईश्वरविषयक विचारांतच मूळशंकर गढून गेलेला असे. विचार, विचार आणि विचार असें त्याचें चाललें होतें. अर्थात् शिवरात्रीचा प्रसंग घडला तरी वडिलांविषयीं त्याच्या मनांत कोठलीहि अनादराची भावना निर्माण झाली नाहीं. त्यांच्याबद्दल योग्य तो आदर बाळगूनहि तो आपल्याला जें सत्य जाणवलें होतें त्याचा त्याग करायला तयार नव्हता.

यानंतर दोन वर्षांचा काळ असाच गेला. मूळशंकर सोळा वर्षांचा झाला. वडिलांबरोबर आतांहि तो वेगवेगळ्या कार्यक्रमांना जाई.

मूर्तीची पूजा तेवढी तो करीत नसे. त्या दिवशीं गांवांत नृत्यसंगीताचा एक कार्यक्रम होता. अंबाशंकर त्याला घेऊन कार्यक्रमाला गेले होते. कार्यक्रम अगदीं रंगांत आला होता. इतक्यांत घरून कोणीतरी धांवत-पळत निरोप घेऊन आला. मूळशंकरची धाकटी बहीण एकाएकीं आजारी झाली होती. तिला कॉलरा झाला होता. दोघे तडक घरीं आले.

धाकटी बहीण अगदीं दुबळी, निस्तेज झाली होती. चेहऱ्यावर मरणकळा पसरली होती. मूळशंकरला भडभडून आलें. कांहीं वेळानें ती बहीण निवर्तली. घरांतली सर्व मंडळी धाय मोकलून रडूं लागली. पण मूळशंकर एकदम गंभीर झाला. मृत्यु! मानवी जीवनांतला हा एक अत्यंत गंभीर प्रश्न आहे. मृत्यूचें कोडें सुटलें पाहिजे. विनाशी शरीरानें ह्या अमर मृत्यूला जिंकतां येईल का? मूळशंकर याच विचारांत गढून गेला. कॉलरा सालोसाल भेटी देत असे. बहिणीनंतर त्याच्या आवडत्या काकांनाहि कॉलऱ्यानें ओढून नेलें. मूळशंकरवर ह्या दोन आघातांनीं फार खोल परिणाम केला. तो उदास-गंभीर दिसूं लागला. ऐन तारुण्यांतली त्याची ही उदास-गंभीर वृत्ति पाहून आई-वडिलांच्या काळजांत चर्र झालें! मुलाला वेड लागतें कीं काय, अशी भीति वाटूं लागली.

* * *

# सुधा चैतन्य

मूळशंकरची विचित्र चित्तवृत्ति पाहून आई-वडिलांना मोठा घोर लागून राहिला. मूळशंकर घरांत वागत—वावरत होता, अडलीं पडलीं कामें करीत होता, परंतु त्याचें कशांतच लक्ष लागत नसावेंसें वाटे. कोणतेंहि काम तो उदासपणें असें करी कीं, त्याचें चित्त त्यांत नाहीं, असें सहज वाटावें. आई-वडिलांनीं कितीहि खंत केली तरी त्याचा कांहीं उपयोग नव्हता. शेवटीं सर्वसाधारण माणसाला सुचणारा लौकिकी इलाज त्यांना सुचला. एकदां लग्न लावून दिलें कीं मूळशंकर ताळ्यावर येईल, असें त्यांना वाटलें. लग्नाची गोष्ट काढली कीं मूळशंकर रागावत, चिडत असे. त्याला त्यामुळें वाईटहि वाटे. आपल्यापुढें केवढाले गहन प्रश्न आहेत, ते सोडवण्याच्या आपल्या धडपडींत मदत करण्याऐवजीं सगळे लोक आपल्याला दुसऱ्या कुठें तरी गुंतवण्याचा असा कां प्रयत्न करतात, असें त्याच्या मनांत येई.

ज्ञानासाठीं सर्वस्व सोडणाऱ्यांच्या किती तरी गोष्टी त्याला ठाऊक होत्या. नचिकेत्यानें तर प्रत्यक्ष यमधर्मापासूनच मृत्यूचें रहस्य जाणून घेण्याची आकांक्षा धरली होती. विषम परिस्थितींत विद्येची आराधना करणारे एकलव्य, कर्ण हेहि त्याला ठाऊक होते. मग त्याच भारत देशांत आज असें दृश्य कां दिसावें? 'जा, तुला जें ज्ञान मिळवायचें, त्यासाठीं येणाऱ्या आपत्ति सहन कर आणि कृतार्थ हो' असें कोणीच कसें म्हणत नाहीं? उलट ज्ञानाची तृष्णा मारण्यासाठीं लग्नाच्या बेड्या पायांत ठोकण्याचाच इलाज लोकांना कसा सुचतो?

आजवर वडिलांशीं मतभेदाचा जेव्हां जेव्हां प्रसंग आला होता त्या त्या वेळीं मूळशंकरची आई त्याच्या पाठीशीं उभी असे. पण या वेळीं मात्र त्याचा तोहि हुकमी आधार ढळला होता. आईहि वडिलांसारखेंच बोलत होती. मूळशंकर विचारांत पडला.

त्यानें एक तोड काढली. 'बनारसला मी संस्कृतचें अध्ययन करायला जातो' असें तो म्हणूं लागला. शेवटीं मधला मार्ग म्हणून वडिलांनीं त्याला जवळच्या गांवांत एक पंडित होता त्याच्याकडे संस्कृत शिकायला ठेवलें. मूळशंकर आतां अध्ययनांत गढून जाऊं लागला. एकंदां कशावरून तरी बोलणें निघालें. लग्नाचा विषय सुरू झाला. आईवडील आपलें लग्न करण्याचा विचार करीत असतां आपण त्या गोष्टीला कसा विरोध केला, तें नकळत मूळशंकरच्या तोंडून बाहेर आलें. मूळशंकरच्या संस्कृत शिकण्याच्या छंदाला—त्याच्या आई-वडिलांना तो त्याचा छांदिष्टपणाच वाटत होता—त्यांनीं याच आशेनें परवानगी दिली होती कीं, आज ना उद्यां त्याच्या डोक्यांतलें खूळ जाईल आणि चारचौघांसारखा तो एक गृहस्थ बनेल! पण त्याच्या मनांत अजून ज्ञान मिळवण्याचेच विचार घोळत होते. वडिलांना त्या पंडितजींकडून ही हकीगत समजली. एव्हांना मूळशंकरनें विशी ओलांडली होती.

मूळशंकरचे आईवडील आतां त्याच्या लग्नासाठीं जारीनें खटपट करूं लागले. घर सोडून पळून जाण्याशिवाय आतां गत्यंतरच नाहीं, असें मूळशंकरच्या मनांत आलें. एक दिवस संधि साधून त्यानें घरांतून पोबारा केला! गुरूचा शोध करीत तो वणवण भटकूं लागला. सुधा चैतन्य हें नांव त्यानें धारण केलें. या भ्रमंतींत एक दिवस मोठाच बांका प्रसंग त्याच्यावर गुदरला. समाजाची सेवा करणारे, त्याला उद्‌बोधन करणारे ते साधु, अशी त्याची समजूत होती. पण एकदां त्याला रस्त्यांत साधूंनींच लुटलें! सुधा चैतन्याच्या मनावर याचा फार परिणाम झाला.

गांवोगांव समाजाची दुर्दशा त्याच्या नजरेला पडूं लागली. एके काळीं जगद्‌गुरु पदवीला पोंचलेला, संस्कृतीचें व विद्येचें आगर

असलेला भारतवर्ष आतां अज्ञान व रूढि यांच्या कर्दमांत फसला होता. लोकांचीं जीवनें पामर झालीं होतीं. सर्वत्र एक प्रकारची अवकळा पसरलेली. श्रीहि नव्हती, धीहि नव्हती. निस्तेज, निष्प्राण सांगाडे जणुं सर्वत्र वावरत होते. सुधा चैतन्याला याबद्दल खंत वाटे. यावर इलाज काय, याचा विचार करण्यांत त्याचे दिवसन् दिवस खर्ची पडत.

यात्रांच्या वेळीं लोकसमुदाय मोठा जमतो. साधु-संन्यासी येतात. ज्ञान-चर्चा चालते. लोकजीवनाचें दर्शन होतें. विचारांना फार मोठें खाद्य मिळतें. सुधा चैतन्य असले प्रसंग सहसा चुकवीत नसे. त्याचा योगाचा अभ्यास सुरू होता. सिद्धपूरला मोठी जत्रा भरणार आहे, असें ऐकून सुधा चैतन्यानें तिकडे कूच केलें.

मजल दरमजल करीत तो सिद्धपूरच्या रोखानें निघाला. जे साधु-संन्यासी भेटत त्यांच्याशीं तो चर्चा करी. रस्त्यांत एका साधुमहाराजांनीं त्याला ओळखलें. अंबाशंकर आणि त्यांच्या पत्नी मुलाच्या काळजीनें किती व्याकुळ झाल्या आहेत, हें त्यांना ठाऊक होतें. मूळशंकरनें जरी आपलें नांव सुधा चैतन्य असल्याचें सांगितलें होतें तरी त्यांनीं बोलण्याच्या ओघांत तो मूळशंकरच असल्याबद्दल स्वतःची खात्री पटवून घेतली. आणि त्याच्या घरीं निरोप पाठवला व मुलाला भेटायचें असलें तर सिद्धपूरच्या यात्रेंत या, असें कळवलें. सुधा चैतन्याला अर्थातच या बनावाची कांहींच कल्पना नव्हती. तो त्या साधुमहाराजांच्या संगतीनें सिद्धपूरच्या जत्रेंत येऊन पोंचला.

*     *     *

२०००५
ग्रा. वी.
२०८८
९२१/८१६९

# स्वामी दयानंद सरस्वति

सिद्धपूरच्या यात्रेंत वेगवेगळ्या साधुसंन्याशांच्या सहवासांत सुधा चैतन्य काळ घालवीत होता. मनांतल्या शंकांचें निवारण करणारें कोणी भेटतें का, हें तो पहात होता. ह्या भागांत आणि या वेषांत आपल्याला कोणी ओळखणें शक्य नाहीं, अशी त्याची कल्पना होती. पण साधु महाराजांच्या निरोपाप्रमाणें आलेल्या अंबाशंकरांनीं अवचित त्याला गांठलें. सुधा चैतन्य एकदम मूळशंकर झाला ! अंबाशंकरांनीं जवळजवळ त्याला नजरकैदेंतच ठेवलें. त्याला ते हुकूम फर्मावूं लागले.

मूळशंकरवर अंबाशंकरांनीं सक्त पहारा बसवला होता. त्याला त्याची जाणीवहि त्यांनीं करून दिली होती. हुलकावणी देण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ आहे, ही गोष्ट त्यांनीं त्याला सांगितली होती. रात्रींहि जागता पहारा असायचा. मूळशंकर कुठलीहि नाराजी न दाखवतां त्यांच्याबरोबर मोरवीच्या दिशेनें वाटचाल करीत होता. त्याचें तें सीधें वागणें पाहून पहारेकरी गाफील झाले.

वरवर जरी मूळशंकर शांत-स्वस्थ दिसत असला तरी घरीं परतायची त्याला मुळींच इच्छा नव्हती. घरीं काय वाढून ठेवलें आहे, तें त्याला स्वच्छ दिसत होतें. ज्ञानासाठीं तो तहानलेला होता. पण त्याचें मन समजून घेऊन त्याच्या विकासाला वाव देण्याला कोणीच तयार नव्हतें. समाजाच्या ठरीव सांच्यांत त्याला ठाकूनठोकून बसवण्याचाच वडिलांचा विचार होता. मूळशंकरच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, असें वाटण्याऐवजीं आपल्या कल्पनेप्रमाणें आपल्या अपूर्ण आकांक्षा त्यानें पूर्ण कराव्या, असें त्यांना वाटत होतें.

आपण सुखरूप घरीं पोंचणें, याचा अर्थ काय, हें मूळशंकरला स्वच्छ दिसत होतें. तो निसटण्याची संधि शोधीत होता. रात्रीं सर्वांच्या-

बरोबर तो बिछान्यावर पडे, पण त्याचा डोळ्याला डोळा लागत नसे. सरतेशेवटीं एक दिवस उत्तर रात्रीं पहारेकरी गैरसावध असलेले पाहून लोटालंगोटी घेऊन त्यानें पडावांतून काढता पाय घेतला.

त्याला ठाऊक होतें कीं, उजाडतांच बभ्रा होईल आणि वडील चारी दिशांनीं माणसें पिटाळून आपली शोधाशोध करून आपल्याला पकडून नेतील. आतां पुन्हां सांपडणें म्हणजे कायमचें बंदिस्त होणेंच ठरणार ! त्यामुळें तो बिछान्यावरून निघाला, पण लांब कुठ जाण्याऐवजीं जवळच्याच एका घनदाट पिंपळावर लपून बसला.

उजाडलें! मूळशंकर कुठें दिसेना. प्रथम वाटलें, प्रातर्विधि उरकायला गेला असेल. पण चौकशी करतां दिसून आलें कीं, डोळा चुकवून त्यानें पोबाराच केला आहे! मग धांवाधांव झाली. अंबाशंकर निराश होऊन मोरवीच्या दिशेनें पुढें निघाले आणि मूळशंकरला पकडून आणण्यासाठीं त्यांनीं माणसें पिटाळलीं.

इकडे दिवसभर पिंपळावर घालवून रात्रीं मूळशंकर खालीं उतरला. अर्धी रात्र पडेपर्यंत त्यानें विसांवा घेतला. तो खूप थकला होता. उत्तर रात्रीं उठून त्यानें झपाझप चालायला सुरुवात केली. बडोद्याच्या रोखानें तो निघाला.

बडोद्याला आल्यावर तेथें राहून त्यानें वेदांचें अध्ययन केलें. वेद हाच भारतीय जीवनाचा आधार आहे, असें त्याला आढळून आलें. वेदांवर त्याची अपार श्रद्धा बसली. वेदप्रणीत धर्मकल्पनांचा त्याग केल्यामुळेंच धर्मांत नाना खुळें शिरलीं आहेत, असें त्याला दिसून आलें. त्याच्या हृदयावर वेदांचा फार खोल ठसा उमटला.

पुढें नर्मदातीरीं साधु-संमेलन भरणार असल्याची वार्ता ऐकून त्यानें नर्मदामाईकडे कूच केलें. नाना साधु-संन्यासी त्यानें जवळून पाहिले. स्वामी परमानंद यांच्यापाशीं कांहीं काळ त्यानें अध्ययन केलें. संन्यास-दीक्षा घ्यावी, असें त्याला वाटूं लागलें.

संन्यासाची दीक्षा गुरूपासून घ्यावी लागते. परंतु मूळशंकरचें तें तरणेंबांड शरीर आणि तेजस्वी डोळे पाहून लोकांना वाटे, संन्यास घेण्याला हा अजून पात्र नाहीं. संन्यास याच्या हातून निभणार नाहीं. त्याला दीक्षा द्यायला कोणी तयार होईना. पुढें महाराष्ट्रीय संन्यासी स्वामी पूर्णानंद यांची गांठ पडली. त्यांच्याजवळ तो पुष्कळ दिवस राहिला. स्वामीजींना मूळशंकरचें कडकडीत वैराग्य जाणवलें. त्यांनीं त्याची चांचणी घेतली. मूळशंकर संन्यास घेण्याला लायक आहे, असें त्यांचें मत बनलें. त्यांनीं मूळशंकरला संन्यासाची दीक्षा दिली. त्याचें नवें नांव ठेवलें स्वामी दयानंद सरस्वति.

दयानंदांनीं वेद आणि योग यांचा अभ्यास नेटानें केला. त्याचबरोबर डोळसपणानें समाजाची स्थितिहि पाहिली. नाना साधु-संन्याशांच्या व योग्यांच्या भेटीगांठी घेऊन त्यांच्याशीं चर्चा केल्या. त्यांचे विचार-आचार जाणून घेतले. परिभ्रमण, निरीक्षण, लोकसंपर्क, चिंतन आणि प्रयोग अशा पंचविध साधनांनीं त्यांची ज्ञानसाधना सुरू होती. जीवनाच्या शाळेंत ते शिक्षण घेत होते.

* * *

# साधु चलता भला !

कधीं निसर्गाचें पुस्तक वाचीत तर कधीं समाजाच्या मनांतल्या भावभावनांचा मागोवा घेत, दयानंदांची अखंड यात्रा चालू होती. जें कांहीं ते पहात, ऐकत, वाचीत त्यावर चिंतन करीत. ' सेवा करूनि

तें जाण, नम्र भावें पुसूनिया ' ह्या मार्गानें ते नवें नवें ज्ञान आत्मसात् करीत होते.

दयानंदांचा सेवाभाव, तेजस्वी वागणूक, ज्ञानाची तीव्र ओढ, यमनियमांचें काटेकोर पालन, मनमिळाऊ स्वभाव, सर्वांबद्दलची आपुलकी यांमुळें ते कोठेंहि गेले तरी प्रिय होत. मठमंदिरांच्या जागजागीं केवढाल्या प्रचंड इस्टेटी आहेत, पण त्यांचा विनियोग आळशांना पोसण्याकडेच जणुं होतो. साधुसंन्याशांना हा परिग्रह हवाच कशाला? आणि मग त्या इस्टेटीवरून साधूसाधूंतहि भांडणें, कोर्टकचेऱ्या! समाजाला हे काय धडा घालून देणार? असें दयानंदांच्या मनांत येई. परिग्रह म्हणजे प्रत्यक्ष पापाची जननीच. ज्यानें परिग्रह केला तो सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य या महाव्रतांचें पालन कसें करणार? नाना विचारांचें काहूर त्यांच्या मनांत उसळे. त्यांच्यासारखा तरुण मनुष्य आपला शिष्य बनावा, पुढें गादीला त्यानें वारस व्हावें, असें कांहीं कांहीं मठाधिपतींना वाटे, पण दयानंद अशांच्या थाऱ्याला फारसे रहात नसत. ' साधु चलता भला ' असा त्यांचा बाणा होता.

दयानंदांचें वय तिशीच्या आसपास पोंचलें होतें. एवढ्यांत हरद्वारला कुंभमेळा भरणार असल्याचें त्यांना समजलें. हा कुंभमेळा फार प्रचंड असतो. साऱ्या देशांतून साधुसंत, भक्तभाविक येत असतात. दयानंदांनीं हरद्वारला जायचें ठरवलें. तेथेंहि त्यांनीं कितीतरी साधुसंतांच्या भेटी घेतल्या. पण ज्ञानाचा ठाव घेणारी बुद्धि आणि समाजाच्या प्रचलित परिस्थितीचा विचार करणारें मन त्यांना कुठेंहि दिसलें नाहीं. सगळे जण स्वतःच्या मुक्तीच्या भावनेंत चूर झालेले! समाजाची कणव कोणाला व्याकुळ करीत नव्हती. हरद्वारला दयानंदांना समाधान लाभलें नाहीं. पुन्हां त्यांची भ्रमंति सुरू झाली. आणखी सहा वर्षें हाच क्रम चालला. पुन्हां एकदां सारें नर्मदातीर त्यांनीं पालथें घातलें. या सर्व

प्रवासांत त्यांच्या अध्ययनांत कधींच खंड पडला नाहीं. त्यांची स्मरणशक्ति विलक्षण तेजस्वी होती. त्यांच्या ध्यानांत खूप राही. श्लोकच्या श्लोक पाठ होत.

हिंदु धर्माप्रमाणें इतर धर्मांचाहि त्यांनीं थोडाफार अभ्यास केला. त्यांच्या संस्था पाहिल्या. १८६० सालीं मथुरेला त्यांची स्वामी विरजानंद यांच्याशीं गांठ पडली. स्वामीजी अत्यंत व्युत्पन्न होते. विशेष म्हणजे बालपणापासून ते आंधळे होते. परंतु घराचा त्याग करून त्यांनीं अत्यंत चिकाटीनें अध्ययन केलें होतें. व्याकरण आणि दर्शनशास्त्रें, वेद आणि उपनिषदें या सर्वांचा त्यांनीं ठाव पाहिला होता. दयानंदांना हवें तें ज्ञान, वैराग्य आणि तप विरजानंदांजवळ होतें. दयानंद त्यांच्यापाशीं राहिले, अडीच वर्षे त्यांच्याजवळ अध्ययन केलें. चाळिशीच्या जवळ पोंचलेले असूनहि दयानंदांचा नवें शिकण्याचा उत्साह यत्किंचितहि कमी झालेला नव्हता. त्यांच्यासारखा शिष्य मिळाल्यानें, वासराला पाहून आईला पान्हा फुटावा, तसा विरजानंदांना जणुं पान्हा फुटे. आपलें सर्वस्व ह्या शिष्याला द्यायला ते सिद्ध झाले.

विरजानंदांजवळ अध्ययन करून दयानंदहि संतुष्ट झाले. त्यांच्या मनांतल्या शंका फिटल्या होत्या. त्यांनीं गुरुजींजवळ जाण्याची परवानगी मागितली. गुरुजी म्हणाले : "तुला जायला हरकत नाहीं; मजजवळची सर्व विद्या मीं तुला दिली आहे, रिता झालों आहें. पण जातांना मला कांहीं गुरुदक्षिणा तर देशील ?"

"सांगा गुरुजी, आपल्याला मी काय देऊं ?"

"तूं मला काय देणार नि मी काय घेणार ? तूंहि साधु मीहि साधु ! खऱ्या गुरूला वस्तूची दक्षिणा लागत नाहीं. जा, लोक अज्ञानांत खितपत आहेत, जातिभेदांच्या पंकांत रुतले आहेत, नाना देवदेवतांच्या नांवानें भांडत आहेत. दयाळू परमेश्वराच्या नांवानें परस्परांच्या माना

कापीत आहेत. त्यांना ज्ञान दे. एका देवाची उपासना शिकव. शास्त्रार्थ सांग. वेदांचा झेंडा फडकव. वेदप्रणीत धर्म आजच्या हिंदु समाजाची जडतेंतून, अज्ञानांतून सुटका करील. निर्जीव, निस्तेज समाजांत नवा प्राण आणण्याचें सामर्थ्य वेदांतच आहे. हें काम तूं करणें हीच मला गुरुदक्षिणा !"

विरजानंदांच्या या संदेशानें दयानंदांना परम संतोष झाला. दयानंदांना तरी दुसरी कोठली तळमळ होती? त्यांनाहि तर हा एकच ध्यास होता. विरजानंदांचें चरित्र मनांत घोळवीत दयानंदांनीं मथुरा साडली आणि ते प्रवासार्थ निघाले, नवा आत्मविश्वास आणि स्फूर्ति घेऊन निघाले. आजवर त्यांनीं मिळेल तेवढा ज्ञानाचा संग्रह केला होता. आतां तें अक्षयपात्र भरून ओसंडत होतें.

* * *

# सर्वांगीण सुधारणेची तळमळ

समाजाची सर्वांगीण सुधारणा केली पाहिजे, अशी तळमळ दयानंदांना होती. त्यामुळें त्यांनीं एकांगी विचार न करतां सर्वांगीण सुधारणेचाच विचार केला. एका अर्थानें आकाशच फाटलें होतें. तें जोडायचा संकल्प करणें हें सुद्धां हिमतीचें काम होतें. इंग्रजांचें दास्य देशावर आलें होतें. हें दास्य हाहि देशाच्या एकूण दुःस्थितीचाच अपरिहार्य परिणाम होता. लोकांची विचारशक्ति कमकुवत झाली होती. रूढींचें अवास्तव महत्त्व निर्माण झालें होतें.

स्त्रियांचा दर्जा दासानुदासासारखा झाला होता. एके काळीं शंकराचार्य–मंडनमिश्र यांच्यासारख्या पट्टीच्या पंडितांच्या वादविवादांत पंचाचें काम स्त्रिया करीत. पण आतां त्या स्त्रियांना शिक्षण नव्हतें. 'ढोल गँवार शूद्र पशु नारी, ये सब ताडनके अधिकारी' म्हणजे ढोल, मूर्ख मनुष्य, शूद्र, पशु आणि स्त्री यांना केवळ मार खाण्याचाच अधिकार मिळालेला होता! ज्या समाजांत मातांची अशी दुर्दशा, पहिला गुरु असलेल्या माताच जिथें अशा अज्ञानांत खितपत पडलेल्या तिथें समाजांत विद्येचें काय वातावरण असणार? स्त्रियांनाहि ज्ञानाचीं सर्व दारें मोकळीं झालीं पाहिजेत, असें दयानंदांना दिसून आलें. समाजाच्या कोठल्याहि विभागाला ज्ञानापासून वंचित ठेवणें म्हणजे परमेश्वराचें सर्वव्यापकत्व नाकारण्यासारखेंच आहे. वेद हा तर प्रत्यक्ष परमेश्वराचा उद्गार, मग त्याचें ज्ञान घेण्याचा स्त्रियांना अधिकार नाहीं, असें कसें होईल? त्यांचें मन या रूढ समजुतींविरुद्ध बंड करून उठे.

आणि ती बालविवाहाची पद्धत! या पद्धतीनें तर साऱ्या समाजाचेंच मातेरें केलें. आई-बापांना मुलांचीं लग्नें म्हणजे जणुं भातुकलीचा खेळ वाटे. बाहुलाबाहुलीचीं जणुं तीं लग्नें. गृहस्थधर्म हीं असलीं अर्धकच्चीं माणसें कसा पाळणार? बालविवाह म्हणजे दोन आश्रमांचा नाश! ब्रह्मचर्याची हानि आणि अकालीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार! चार आश्रमांपैकीं दोन आश्रमांचें वाटोळें. बालविवाहाचा दुसरा अपरिहार्य परिणाम म्हणजे बालविधवांची प्रचंड संख्या. त्यांना ना कोठलीहि संधि, ना अधिकार. हजारों-लाखों स्त्रिया अशा प्रकारें पिचत असलेल्या त्यांना दिसत होत्या. कांहीं तर वाईट मार्गालाहि लागत.

स्त्रियांना समाजांत आलेला हीन दर्जा पाहून दयानंदांचें मन उसळे. ज्या समाजानें आपल्या आईच्या जातीला अवहेलनेच्या गर्तेत ढकललें,

आणि त्याबद्दल दुःख करण्याऐवजीं ज्याला अभिमान वाटतो, त्या समाजाची सुधारणा होणार कशी? आईच अज्ञानी तर उद्यांच्या पिढींत विद्येचें प्रेम निर्माण होणार कसें? लहानपणीं जे विद्येचे संस्कार व्हायला हवेत, ते कसे होणार? स्त्रियांना अशा प्रकारें ज्ञानापासून वंचित ठेवल्यावर समाजांत अज्ञान वाढत चाललें आणि दिवसें-दिवस विचारापेक्षां रूढींना आणि धर्मापेक्षां कर्मकांडांना महत्त्व चढलें तर नवल कसलें!

वेदांचा अधिकार ब्राह्मणांना आणि त्यांतहि फक्त पुरुषांना देणें म्हणजे समाजांतील सात-अष्टमांश भागाला अज्ञानाच्या गर्तेंत आपल्या हातानें लोटण्यासारखेंच होतें. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' अशी सुभाषितें ज्या समाजांत रूढ आहेत तो समाज मरणाच्या पंथाला लागला समजावें. स्त्रियांनींहि पुरुषांप्रमाणेंच विद्येची उपासना करावी, असा रिवाज पडला कीं समाजांतील बरींचशीं पापें नाहींशीं होतील, अशी दयानंदांची भूमिका होती. त्या काळांत दयानंदांचे हे विचार अत्यंत क्रांतिकारी होते आणि दयानंद अगदीं निर्भयपणें स्त्री-जीवनाविषयींचे विचार मांडीत. त्यांना रूढिग्रस्त समाज विरोध करी. अधोगतीला लागलेल्या समाजाचें हें दुर्दैव असतें कीं, त्या समाजाला आपलें भलें करणारांचीहि धड ओळख पटत नाहीं! परंतु दयानंदांनीं समाजाचा विरोध पत्करूनहि हें अत्यावश्यक काम हातीं घेतलें.

* * *

# मूर्तिपूजेला विरोध

मूर्तिपूजा चांगल्या उद्देशानें शोधली असली तरी ती समाजाच्या अधःपतनालाच कारणीभूत होत आहे, असें दयानंदांना दिसून आलें. जातिभेद आणि शिवाशिव हें माणुसकीलाहि लांछन, पण मूर्तिपूजेच्या नांवानें त्यांना प्रतिष्ठा लाभली होती. परमेश्वर सर्वव्यापी असल्यानें तो हरिजनांतहि निवास करूं शकत होता, पण ह्या ईश्वराच्या नांवानें उभारलेल्या मूर्ति मात्र हरिजनांच्या स्पर्शानें अपवित्र होत होत्या! देव आणि मानव यांच्यामध्यें पंड्या-बडव्यांचा एक दलालवर्ग उभा राहिला होता आणि गब्बर बनत होता. सदाचारापेक्षां पापाचें पोकळ प्रायश्चित्त घेण्याच्या सोयी काढण्यांतच बुद्धिमत्ता खर्च होत होती. पश्चात्ताप आणि नवजीवनाचा निश्चय याऐवजीं कोठले तरी माकड विधि त्यासाठीं सांगितले जात होते. परमेश्वरानें जी शक्ति दिली तिचा वापर करण्याऐवजीं नवससायास करून इष्टसिद्धीची वाट पहाण्याची आळशी वृत्ति समाजांत माजली होती. साहसाच्या ऐवजीं कोणाचा तरी आधार घेण्याची दुबळी वृत्ति बळावत होती. परमेश्वरानें दिलेल्या शक्तिबुद्धीचा वापर करण्याऐवजीं मूर्तीपुढें प्रार्थनेची पोपटपंची करण्यांतच लोक धन्यता मानत होते. दयानंदांना ही सर्व एक प्रकारची नास्तिकताच वाटत होती. ईश्वराच्या प्रेमाच्या नांवावर मूर्तिपूजेनें ही सर्व नास्तिकता पोसली होती !

आणि तीं मंदिरें! ज्ञानाचीं आणि पावित्र्याचीं, स्वच्छतेचीं आणि सदाचाराचीं वास्तविक तीं आगरें असावीं, पण तेथें काय होतें? समाजाच्या अज्ञानांत आनंद मानणारे भिक्षुक आणि दुबळे भाविक यांचा तेथें वावर होता. सदाचाराचीं प्रशस्तिपत्रें

धनिकांना तेथें मिळत होतीं. पाप करून मुक्त होण्याचे परवाने विकले जात होते. देणग्या देऊन पाप्यांचा उद्धार होत होता. भोळ्या जीवांना भाविकतेच्या कैफांत बुडवून त्यांची लुबाडणूक करणाऱ्या लफंग्यांचा एक वर्ग ह्या मूर्तिपूजेच्या आधारें, या मंदिरांच्या आधारें उभा राहिला होता. समाजाच्या मनांत अनाचारांसंबंधीं तिरस्कार आणि सदाचाराची प्रेरणा निर्माण होण्याऐवजीं अनाचाराला उत्तेजन मिळत होतें.

वास्तविक धर्म हा समाजांत एकसंधपणा निर्माण करणारा, पण मूर्तिपूजेला प्रतिष्ठा लाभली आणि धर्माच्या नांवावरच भेदांचा बुजवुजाट समाजांत माजला. आधींच वर्णभेद आणि जातिभेद यांनीं छिन्नविच्छिन्न झालेल्या ह्या समाजाला नाना देवतांच्या मूर्ति उभ्या करून अधिकच अवकळा प्राप्त झाली. आतां माणसें आपलीं भांडणें देवतांच्या माथीं मारूं लागलीं. गंध उभें कीं आडवें यावरून भांडणें! शैव आणि वैष्णव यांचे झगडे! रामाचे उपासक आणि कृष्णाचे भक्त यांच्यांत श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचे वाद! ज्ञानाचा मार्ग सोडून समाजानें भाकड कथांना धर्माचें रूप दिलें. पुराणांमुळें समाज लाचार आणि अधोगामी बनला.

प्रतीकांची पूजा सुरू करतांना, अज्ञ जनांना सुबोध रीतीनें सदाचार पाळायला लावतां येईल, असें वाटतें. कांहीं काळ तसें घडतेंहि, परंतु पुढें जिवंत माणसें दूर लोटून फत्तराच्या मूर्ति पूजण्याचा रिवाज रूढ होतो. कबीरसाहेबांनीं म्हटलें होतें : "जर दगडाची पूजा करून देव मिळत असेल तर मी ह्या पहाडाची पूजा केलेली काय वाईट? पण त्यापेक्षां ही चक्की अधिक चांगली, निदान तिच्यामुळें लोकांना आपलें धान्य तरी दळून खातां येतें!"

आपल्या आसपासची ही सारी सृष्टिच जर प्रभुमय आहे तर आणखी वेगळ्या मूर्ति कशाला? मूर्तिपूजेशिवाय ईश्वराची भक्तिच

करतां येत नाहीं, ही भावना माणसांना पंगु बनवते. इतर धर्मांत मूर्तिपूजा नाहीं म्हणून ते धर्म पाळणारे कांहीं नास्तिक नाहीं बनले! ख्रिस्ती किंवा मुसलमान कुठें मूर्तिपूजा करतात? मूर्तिपूजा ही पुराणग्रंथांमुळें रूढ झाली. अपौरुषेय अशा वेदांत मूर्तिपूजा कुठें आहे? 'न तस्य प्रतिमा अस्ति—त्याची प्रतिमा असत नाहीं' असें तर प्रत्यक्ष वेदवचनच आहे.

दयानंदांना मूर्तिपूजेमधील उणिवांची जाणीव बाळपणींच झाली होती. शिवलिंगावर खेळणाऱ्या उंदरामुळें तर विचारांच्या प्रचंड वादळांत सांपडून घरादाराचा त्याग करून ते ज्ञानाचा शोध करायला निघाले होते. मूर्ति म्हणजे परमेश्वर नव्हे, मूर्तीमुळें माणूस खऱ्या ईश्वरभक्तीपासून दुरावतो, असें त्यांच्या अनुभवाला आलें होतें. त्यांनीं मूर्तिपूजेंतली व्यर्थता लोकांना सांगायला प्रारंभ केला. हजारों वर्षें जी मूर्तिपूजा लोकांनीं हृदयाशीं कवटाळली तिच्याविरुद्ध उभा राहिलेला विचार समजून घेण्याची वृत्ति अज्ञान व रूढि यांच्यांत गुरफटलेल्या लोकांत नव्हती. त्यामुळें दयानंदांच्या त्या विचारांच्या विरुद्ध एक आघाडी तयार होऊं लागली. शास्त्रार्थासाठीं पंडित दयानंदांना आव्हानें देऊं लागले. दयानंदहि ह्या आव्हानांचा स्वीकार करूं लागले.

* * *

म. ए. सो. [illegible], वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. ८१९५ नों. दि. ..................
वि. ...... [illegible] ..................

# ज्ञानप्रवर्तन यात्रा

कुठल्याहि नव्या क्रांतिकारी विचाराचा प्रत्यय माणसाला आला कीं तो माणसाला स्वस्थ बसूं देत नाहीं. गायीची कास तटातट फुगली कीं ती वात्सल्यानें वासराच्या शोधांत धांवूं लागतें. कास रिकामी झाल्याखेरीज तिला समाधान कसें तें होतच नाहीं. शंकराचार्यांना ज्ञानाचा प्रत्यय आला आणि वाहतुकीच्या साधनांची कांहीं सोय नसलेल्या त्या काळांतहि त्यांनीं सारा भारतवर्ष घुसळून काढला. देशाच्या चार कोपऱ्यांवर चार मठांची स्थापना केली. भगवान् बुद्धाला ज्ञान झालें आणि त्याचीहि भ्रमंति सुरू झाली. जगभरचा हाच अनुभव आहे. नवविचारांनीं जो प्रेरित झाला त्याला मग विश्रांति ठाऊक नसते. दयानंदांचेंहि आतां तसेंच झालें. खोट्या धर्मकल्पनांतून लोकांना मुक्त करण्याच्या भावनेनें त्यांना इतकें भारलें कीं, त्यांना आतां एका जागीं स्वस्थ बसणें शक्य नव्हतें. त्यांचा प्रवास सुरू झाला. जेथें जातील तेथें ते आपले विचार लोकांना समजावून सांगूं लागले. चर्चा करायला येणारांशीं चर्चा करूं लागले. कधीं लाहोर तर कधीं दिल्ली; कधीं कलकत्ता तर कधीं अहमदाबाद तर कधीं मुंबई असे त्यांचे दौरे सुरू झाले. त्यांचे दरवाजे सर्वांना उघडे असत. त्यांची कळकळ त्यांच्या शब्दांशब्दांत व्यक्त होत असे. वेद तर त्यांना मुखोद्गत होते. वेद-वचनांचीं अवतरणें ते क्षणाक्षणाला देत.

त्या काळांत धर्मसुधारणेची एक लाटच देशांत उठली होती. देशाला आलेल्या दुर्दिनांची ज्याला ज्याला म्हणून चिंता त्या त्या प्रत्येकाला धर्माचें स्वरूप शुद्ध व्हावें व त्यांतल्या ओंगळ रूढि व रिवाज यांतून माणसांची सुटका व्हावी असें वाटे. तिकडे बंगालमध्यें राजा राममोहन राय यांनीं ब्राह्मो समाजाची स्थापना केली होती.

उपनिषत्कालीन धर्म पुन्हां देशांत प्रस्थापित व्हावा, अशी त्यांना तळमळ होती. इकडे मराठी विभागांत रानडे, भांडारकर प्रभृतींनीं भागवत संतांच्या वचनांचा आधार घेऊन धर्मपरिष्करणाचें काम आरंभलें होतें. प्रार्थना समाजाची त्यांनीं स्थापना केली. ह्या दोन्ही पंथांचा उदय झाला तो मात्र पाश्चात्यांच्या नवविचारांमुळें, इंग्रजी भाषेमुळें. दयानंदांचा विचार सुरू झाला तो केवळ भारतीय लोकजीवनाची दैना पाहून. इंग्रजी भाषा त्यांना येतच नव्हती. पुढें आपल्या विचारांना परिपूर्णता येण्यासाठीं इंग्रजी आपण शिकलें पाहिजे, असें त्यांना कोणी मित्रानें सांगितलें, तेव्हां दयानंदांनीं एखाद्या बालकाच्या उत्साहानें इंग्रजी शिकायला प्रारंभ केला. परंतु सततचें परिभ्रमण, वादविवाद, चर्चा यांमुळें त्यांना इंग्रजीच्या अभ्यासाचा आपला विचार तडीस नेतां आला नाहीं.

नवविचारांचा वारा ज्यांना सहन होत नाहीं असे शास्त्री-पंडित, ज्यांची उपजीविका रूढ धर्मावर अवलंबून आहे असे पंडे-पुरोहित आणि भोळी–अज्ञानी जनता या सर्वांनीं दयानंदांच्या नव्या विचारांची धास्ती घेतली. श्रद्धेमुळें एक प्रकारचें लटकें संरक्षण त्यांना वाटत होतें. या लोकांनीं दयानंदांविरुद्ध एक आघाडी उघडली. दयानंदांना वाळींत टाकण्याचा प्रथम प्रयत्न झाला. पण त्याचा त्यांच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. नंतर त्यांना छुपे मिशनरी ठरवण्याचा प्रयत्न झाला, पण ते तर सर्व गोष्टी वेदांच्या आधारें सांगत होते, त्यामुळें तोहि डाव फसला. मग त्यांना वादांत जिंकण्याची तयारी शास्त्रीपंडितांनीं केली आणि जाहीर वादविवाद सुरू झाले. पक्षपाती पंच आणवून दयानंदांना आपण वादांत जिंकलें, अशीं प्रमाणपत्रें जमा करण्याचा प्रयत्न झाला. पण ज्ञान अशा कोणत्याहि प्रकारांनीं थोपवतां येत नाहीं. दयानंदांनीं हिंदी भाषेचा

सर्रास वापर करायला प्रारंभ केला. त्यामुळें सर्वसामान्य लोकांनाहि त्यांचें म्हणणें प्रत्यक्ष ऐकायला मिळूं लागलें.

* * *

## सत्यार्थप्रकाश

पंडितांशीं वादविवाद करण्यांत फार शक्ति खर्च करायची नाहीं, असें दयानंदांनीं ठरवलें. त्यांनीं आपले समाजासंबंधींचे विचार सर्वत्र पसरावे म्हणून ग्रंथरचना केली. प्रत्यक्ष जाऊन लोकांना समजावून सांगायचें म्हटलें तर त्याला फार मर्यादा पडतात.. वेदप्रणीत जीवनादर्श त्यांनीं लोकांपुढें मांडला. 'सत्यार्थप्रकाश' ह्या ग्रंथांत त्यांचे प्रायः सर्व विचार ग्रथित झाले आहेत. दयानंद म्हणत : "अज्ञानांत गुरफटलेल्यांना मुक्त करणें हें माझें काम आहे. त्यांना दुसऱ्या नव्या तुरुंगांत मी डांबूं इच्छीत नाहीं." दयानंदांना लोकांचा बौद्धिक आळशीपणा ठाऊक होता. माणसाचे विचार ग्रहण करण्याऐवजीं कांहीं उत्कट, भव्य दिसलें कीं माणसें त्याच्या छंदीं लागतात, त्याचे देव्हारे माजवतात, पूजा करतात. दयानंद म्हणत : " दयानंदाला देव करूं नका. ग्रंथाच्या शब्दांत गुरफटूं नका. पोपटपंची करतां येणें म्हणजे धर्म नव्हे. हृदयांतला दिवा प्रकाशित करा आणि त्याच्याच प्रकाशांत सर्व गोष्टी करायला शिका."

दयानंदांनीं ज्ञान हें कोणा एका वर्णापुरतें किंवा जातीपुरतें मर्यादित असूं शकत नाहीं, तसे तें ठेवूं पहाणें हा अन्याय आहे, ही 'गोष्ट

प्रभावीपणें लोकांना सांगितली. मुंजीचा म्हणजेच द्विज होण्याचा, वेदाध्ययनाचा, गायत्रीमंत्राचा अधिकार सर्वांना आहे, असें त्यांनीं सांगितलें व त्याप्रमाणें त्यांनीं प्रत्यक्ष उदाहरणाहि घालून दिलें. अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनीं आवाज उठवला. जातिभेदाला विरोध केला. वधूवरांना परस्परांच्या निवडीचें स्वातंत्र्य असलें पाहिजे व यासाठीं सुशिक्षण आणि प्रौढविवाह रूढ झाले पाहिजेत, असें त्यांनीं सांगितलें.

गुरुकुल पद्धतीची शिक्षणपद्धति सुरू झाली पाहिजे, असें त्यांचें मत होतें. संस्कृत भाषेवर त्यांचें परमावधीचें प्रेम होतें. ती भाषा सर्वांनीं शिकावी, असें त्यांना वाटे. ज्ञानाच्या क्षेत्रांत आपपरभाव असतां कामा नये, असें ते सांगत. नवनव्या संशोधनाचा फायदा घ्यावा, असें ते म्हणत. गुरुकुलांत आपल्याकडील ज्ञानाला पाश्चात्य विद्येची जोड देण्याला त्यांचा विरोध नव्हता. गुरुकुल पद्धतीवर आपली राष्ट्रीय शिक्षण योजना असावी, असें त्यांना वाटे आणि प्राचीन गुरुकुलांत ज्याप्रमाणें कृष्ण आणि सुदामा या सर्वांना एकत्र आणि समान हक्कानें शिक्षण दिलें जाई तसेंच आधुनिक गुरुकुलांतहि व्हावें, अशी त्यांची मनीषा होती. "शिक्षण तर प्रत्येकाला मोफत मिळावेंच, पण विद्यार्थ्याला अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण-साहित्यहि मोफत मिळालें पाहिजे. यामुळेंच शिक्षण सार्वत्रिक होईल आणि समाजांत प्रेमभाव वाढेल. समाजांतल्या सर्व मुलांना सारखी वागणूक बालपणापासून मिळाल्यानें त्यांच्यांत उच्चनीच भावना निर्माण होणार नाहीं. शरीर, मन आणि बुद्धि या तिन्ही गोष्टींत विद्यार्थ्यांना सामर्थ्यसंपन्न करणें हा शिक्षणाचा प्रधान हेतु असला पाहिजे" असें ते म्हणत. शाळा निसर्गसान्निध्यांत असाव्यात. स्वच्छता आणि आरोग्याचें शिक्षण हा शिक्षणाचा पाया आहे, असें

त्यांचें मत होतें. मुलांना कोठल्याहि कष्टांची लाज वाटतां कामा नये, असें ते म्हणत आणि एका पाठशाळेच्या मुलांकडून त्यांनीं भिंत बांधण्याचें कामहि करून घेतलें होतें.

ज्ञान हें निर्भय असलें पाहिजे, विचारांचें, चर्चेचें, वादविवादाचें ज्याला भय वाटतें तें ज्ञानच नव्हे, असें त्यांना वाटे. असें ज्ञान देण्याची दयानंदांची इच्छा होती. त्यामुळें वेदप्रणीत धर्माचें प्रतिपादन ते करीत असले तरी ख्रिस्ती, मुसलमान वगैरे धर्मीयांशींहि चर्चा करायला त तयार असत. निर्भयतेंत ज्ञानाचा खरा गौरव आहे. असें ज्ञान सर्वत्र पसरावें ही दयानंदांना तळमळ होती.

* * *

## आर्यसमाज

दयानंदांनीं सत्यार्थप्रकाशांत आपले विचार ग्रथित केले. हे विचार ज्यांना मान्य होते, अशांनीं एकत्र यावें व विचारविनिमय करावा, हे विचार अधिकाधिक प्रसृत करावे, या दृष्टीनें १८७५ सालीं प्रथम राजकोट, मुंबई व लाहोर येथें आर्यसमाजाची स्थापना झाली.

आर्यसमाजाची स्थापना पुढील तत्त्वानुसार करण्यांत आली होती : ईश्वर एकच असून तो ज्ञानदाता आहे. सत्य हाच ईश्वर असून ज्ञान हें त्याचें वरदान आहे. ईश्वर अनादि, अनंत, सर्व शक्तिमान्, दयाळू व

न्यायी आहे. भक्तीला तोच एक पात्र आहे, मूर्ति नव्हेत. वेद हा ज्ञानग्रंथ असून त्याचें अध्ययन–अध्यापन जास्तींत जास्त व्हावें. तो वाचावा. ऐकवावा. सत्याचा स्वीकार आणि असत्याचा त्याग करणें हें मानवमात्राचें कर्तव्य आहे. मानवमात्राचें भौतिक, सामाजिक व मानसिक भलें करणें हा आर्यसमाजाचा उद्देश आहे. प्रेम, उदारता आणि न्याय वाढवण्याच्या दृष्टीनें सर्वांनीं प्रयत्न करावा. ज्ञानाचा प्रचार आणि अज्ञानाचा परिहार व्हावा या दृष्टीनें सर्वांनीं प्रयत्न करावा. सर्वांच्या भल्यांतच व्यक्तीनें आपलें भलें पहावें. समाजाच्या हितासाठीं व्यक्तीनें आपल्या हिताचा जरूर तर त्याग करावा.

एकट्यादुकट्या व्यक्तीपेक्षां व्यक्तिसमुदाय अधिक हिमतीनें नवमार्गानें जाऊं शकतो. त्यासाठीं असा सामुदायिक प्रयत्न दयानंदांना आवश्यक वाटत होता.

दयानंदांना चाळिसाव्या वर्षीं ते शोधीत असलेला लोककल्याणाचा मार्ग सांपडला आणि तेव्हांपासून निरंतर ज्ञानप्रचार आणि त्यासाठीं प्रवास यांत त्यांचा काल गेला. शतकानुशतकें हाडीमाशीं खिळलेला जातिवाद आणि स्पृश्यास्पृश्यता त्यांना घालवायचीं होतीं. स्त्रियांना शिक्षण मिळावें, बालविवाह बंद व्हावे, म्हणून त्यांना प्रयत्न करायचा होता. समाजांतलें दातृत्व जागें करून अनाथ–पीडितांची सोय करायची होती. नवशिक्षणपद्धतीचा प्रचार करून शिक्षण सार्वत्रिक व्हावें ही त्यांना तळमळ होती. नाना देवदेवता आणि मूर्तिपूजा यांमुळें समाजांत माजणाऱ्या दंभावर तर त्यांचा हल्लाच होता. शेंकडों वर्षें रूढींच्या दास्यांत सांपडलेला आणि अज्ञानानें अजगराप्रमाणें सुस्तावलेला हा समाज जागा व्हावा म्हणून त्यांना तीव्र उपाय योजावे लागले, कधीं आक्रमक धोरणहि पत्करावें लागलें. परंतु त्यांच्या हृदयांत मानवकल्याणाखेरीज दुसरी भावना नव्हती.

ते म्हणत: " साऱ्या जगाचाच एक धर्म झाला पाहिजे. त्यासाठीं विचारविनिमय व संवाद करावा व सत्य जाणून घ्यावें."

दयानंदांचें असें नानाविध कार्य चालू होतें, त्यांना एकदां कोणीसें 'ऋषि' म्हणालें. दयानंद म्हणाले: " मी कसला ऋषि! मी जर कणादादींच्या युगांत वावरत असतों तर ऋषि तर सोडाच, पण विद्वान् पदवीला देखील पात्र ठरलों नसतों!" कॉंग्रेसचे संस्थापक ह्यूम साहेब त्यांना एकदां भेटायला आले होते. त्यांनीं विचारलें, " तुम्ही का ईश्वराचे प्रेषित आहांत?" दयानंद म्हणाले: " छे छे! मी प्रेषित वगैरे नाहीं, मी त्याचा एक छोटासा सेवक मात्र आहें." दयानंदांची नम्रता ही अशी होती. दयानंदांना मानणारे लोक पुष्कळ होते, पण दयानंदांना गुरुबाजीचा तिटकारा होता.

* * *

# महासमाधि

दयानंदांना एकूणसाठावें वर्ष लागलें. सततची दगदग आणि प्रवास. विश्रांति अशी त्यांना नव्हतीच. त्यामुळें त्यांची प्रकृति खालावली, पोटांत विकार झाला. दयानंद म्हणत: " योगी झाला म्हणून काय झालें? निसर्गाचे नियम त्यालाहि लागू असतात " लोक त्यांची थोरवी ऐकून पहायला येत. दयानंद म्हणत: " लोक गंभीरपणें विचार करण्याला तयार नसतात. त्यांना पाहिजे फक्त दर्शन! तें मिळालें म्हणजे त्यांना वाटतें आपण सारें करून पावलों!

२८००१७ ७१ ९१ २८०८८ ९१११/९१

मला असे गंमतबाज लोक नकोत. खरे अभ्यासू आणि जिज्ञासू हवेत." ज्याचा ज्याचा मानवजीवनाशीं संबंध त्या सर्व गोष्टींत दयानंदांना गोडी होती.

त्यांच्या पोटांतला विकार बळावतांच त्यांच्या मित्रांनीं आग्रह करून त्यांच्यावर इलाज करवले. पण प्रकृति खालावतच चालली. प्रथम कांहीं दिवस ते अबूच्या पहाडावर होते. नंतर अजमेरला गेले. दयानंदांची तब्येत चांगली नाहीं, असें समजतांच त्यांच्या निवासस्थानीं लोकांची नुसती रीघ लागे. दयानंद शांत-प्रसन्नपणें सर्व व्यथा सहन करीत होते. परंतु अजमेरला येऊनहि त्यांच्या प्रकृतीला उतार पडेना.

३० ऑक्टोबर १८८३. दयानंदांना कळून चुकलें कीं, काळ आला आहे. त्यांनीं शौचमुखमार्जन केलें. न्हाव्याकडून दाढी-केस कापवले. स्नान केलें. नंतर ते आपल्या बिछान्यावर येऊन ध्यानस्थ बसले. सायंकाळची वेळ होती. दयानंदानीं घराचीं सर्व दारें-खिडक्या उघडायला सांगितलीं. दिवस दिवाळीचा होता. दयानंदांनीं वेदमंत्र म्हटले. त्यानंतर प्रार्थना केली. "ईश्वरा, तुझी इच्छा असेल तसें होवो. तुझी लीला अतर्क्य आहे." त्यानंतर त्यांनीं गायत्री मंत्राचा उच्चार केला. "देह, प्राण आणि मन यांनीं प्रकाशाच्या देवतेचें, त्या रविराजाचें ध्यान आपण करूं या. तो आपल्या सर्वांच्या बुद्धीस प्रेरणा देवो" असें ध्यान करीत करीत दयानंदांनीं देह ठेवला!

सतत दीड तप त्यांनीं वेदप्रणीत धर्माचा प्रचार एखाद्या योद्धया-प्रमाणें केला. अज्ञानाविरुद्ध त्यांची लढाई होती. दयानंदांनीं मानवी जीवनाचें परम सत्य शोधण्यासाठीं घरादाराचा त्याग केला आणि वर्षानुवर्षें त्या सत्याचा मागोवा घेत अनंत हालअपेष्टा सहन करून ते

उत्तर शोधलें. त्या सत्याचा त्यांनीं निरंतर प्रचार केला. विद्वत्ता, वक्तृत्व आणि लेखनकला यांचा समन्वय त्यांच्या ठिकाणीं झाला होता. ते जन्मजात लढवय्ये होते. एकेश्वर—उपासनेचा त्यांनीं प्रचार केला आणि धर्माबाबत सर्वांना समान अधिकार मिळवून दिले. दीनांचे ते कनवाळू होते.

थोर पुरुषांचा समाजावर प्रभाव विलक्षण रीतीनें पडलेला असतो. कुठल्याहि बाह्य मापांनीं तो मोजूं पाहणें व्यर्थ आहे. थोर पुरुष हे त्यांनीं उभारलेल्या प्रत्यक्ष कामापेक्षां पुष्कळच मोठे असतात. त्यांचा प्रभाव त्यांच्या कामावरून ठरवूं पाहणें म्हणजे स्वतःची फसगत करून घेणें. भिन्न भिन्न विचारांच्या थोर पुरुषांत तात्कालिक विरोध भासला तरी शेवटीं त्यांचें कार्य परस्परांना पूरकच असतें. विज्ञानवेत्त्यांत मत-भिन्नता असते, परंतु त्यांचा स्वभाव उमदा असतो. म्हणून प्रयोगानें सिद्ध झालेलें सत्य ग्रहण करण्याला ते सतत तयार असतात व त्यामुळें वरवर पाहतां परस्परविरोधी वाटणारें त्यांचें कार्य परस्परपूरकच ठरतें. सत्याच्या सर्वच उपासकांचें असें असतें. त्यामुळें थोर पुरुषांच्या विचारांचा सतत मंगल मेळ होत असतो आणि त्या विचारसंगमावरच आपलीं जीवनें सर्वसामान्य लोक निर्मळ करून घेतात. सूर्य हजारों अंश उष्णतेनें जळत असतो तेव्हां माणसाच्या अंगांत ९८ अंश उष्णता राहते. महापुरुषहि तीव्रतेनें कार्य करीत असतात म्हणून सर्वसामान्य जनतेंत जिवंतपणा दिसतो. दयानंदांमध्यें समाजसुधारणेची जी पोटतिडिक होती ती त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. समाजाची जडता पाहून त्यांना तीव्र उपाय करायला भाग पाडीत होती.

भारताच्या नवजागरणाच्या इतिहासांतील दयानंद ही एक अपूर्व विभूति होती. दयानंदांच्या विचारांचा प्रभाव नंतरच्या भारतीय जीवनावर केवढा तरी झालेला आहे. भारताच्या नवजागरणाच्या

चळवळींत त्यांनीं प्राचीन आर्यतेचें सत्त्व ओतलें. दयानंदांची थोरवी ही आहे कीं, प्रवाहपतित जीवनाचा त्याग करून त्यांनीं दुःखाकष्टांचें जीवन पत्करलें. प्रवाहाविरुद्ध पोहण्यांत कृतार्थता मानली. कारण तोच मार्ग समाजदृष्टया अभीष्ट आहे, अशी त्यांची खात्री होती. त्यांना हृदयस्थ परमेश्वराची साद ऐकूं येत होती. त्यांचे डोळे भविष्यकाळाचा वेध घेऊं शकत होते. त्यांचे हात शक्तिशाली होते. आपल्या प्रतिभेला दिसलेलें चित्र संपूर्ण साकार करण्यासाठीं त्यांनीं आपल्या सर्व शक्ति कारणीं लावल्या. आधुनिक भारताच्या शिल्पकारांतील ते एक अग्रणी शिल्पकार होते.

* *

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ..........
..........
नों. दि.
वाचनालय शाखा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ८९९५ नों. दि ..............
वि. .......... क्र. ..............

## वृत्तपत्रांनीं उत्कृष्ट अभिप्राय देऊन गौरविलेलीं छान छान पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| स्वामी विवेकानंद : | यदुनाथ थत्ते | : ५० नवे पैसे |
| स्वामी रामतीर्थ : | ,, | : ५० नवे पैसे |
| महर्षि अरविंद : | ,, | : ५० नवे पैसे |
| श्रीरामकृष्ण परमहंस : | ,, | : ४० नवे पैसे |
| दिग्विजय : | गो. नी. दांडेकर | : ५० नवे पैसे |
| परिमल : | यदुनाथ थत्ते | : दीड रुपया |
| बिरबल : | अं. शं. अग्निहोत्री | : दीड रुपया |
| अरबी अद्भुत कथा : | रामकृष्ण चौधरी | : सव्वा रुपया |
| इसापनीति : | म. स. भावे | : दीड रुपया |
| आधुनिक भारतमहर्षि : | यदुनाथ थत्ते | : दीड रुपया |
| भारतीय वैज्ञानिक : | ,, | : दोन रुपये |
| दयानंद सरस्वति : | | नवे पैसे |

IRBK-0108195

IRBK-0108195



प्रकाशिका :

सौ. शैलजा भावे,
श्रीराम प्रकाशन,
ठाकुरद्वार, मुंबई २.

प्रथमावृत्ति
१९५९

श्रीपाद जगन्नाथ गानू,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण, पुणें २.